# राशिभविष्य - मार्च, २०१७.

दादा दामले (dadadamle@gmail.com)

==========================================================

**(१) मेष -** या राशीच्या मंडळींनी या महिन्याच्या काळात आपल्या स्वाभाविक दोषांवर नियंत्रण ठेवून नम्रतेने आचरण केल्यास खूपच सुखाचे होईल. नपेक्षा हट्टी, अहंकारी, हेकट स्वभावामुळे अकारण कष्ट, श्रम , दगदग होईल व त्यातून सर्व प्रकारचे आरोग्यावर विपरीत परिणाम होईल. जपा. तसेच या राशीच्या व्ययस्थानी असलेला हर्षल असह्य मनस्ताप देणाऱ्या घटना घडविण्याची दाट शक्यता दिसते. जपा. अकारण शत्रुत्व निर्माण होणे, सांपत्तिक अडचणी निर्माण होणे, बेअब्रूच्या घटना घडणे अशा प्रकारचे त्रास निर्माण होणे संभवते. जपा. वाममार्गी मित्रांपासून दूर राहा. तसेच सर्व आर्थिक व्यवहार काळजीपूर्वक करा. काल्पनिक चिंता करू नका. तसे कराल तर गहरे नैराश्य येईल. नोकरी-व्यवसाय कोणताही असो, या महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल होणार असल्याने जे काय साध्य करावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा आटोकाट प्रयत्न करा. गुरु ग्रहाच्या अनुकुलतेने महिन्याच्या पूर्वार्धातच नोकरी-व्यवसायात प्रगती, यश , लाभ होणे संभवते. विशेष करून वकिली, सल्लागारी व्यवसाय, कमिशन, दलाली असे व्यवसाय असणारांना हा गुरु ग्रह अधिक अनुकुल व लाभदायक होईल. छोट्या - मोठ्या प्रवासाचे योग संभवतात. नोकरदार मंडळीना बढती, पगारवाढ, क्वचित कोणास एखादे उच्च किंवा मानाचे पद मिळू शकेल. महिन्याच्या उत्तरार्धात प्रतिकुल ग्रहस्थितीमुळे अडचणी, अडथळे , पराभव अशा प्रसंगांना तोंड द्यावे लागण्याची शक्यता दिसते. जपा. राहूमुळे विविध कारणांनी संततिसुखात बाधा येणे शक्य दिसते. शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल.

श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना अनुकुल होईल. त्यामुळे प्रतिकुल काळ सुसह्य होईल.

**(२) वृषभ -** या राशीच्या सर्व नोकरदार मंडळीना या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. विशेष करून मानसिक आजार तज्ञ व द्रव पदार्थांचे व्यापारी , उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यरत असणारांना काळ अधिक प्रमाणात अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. या राशीच्या सर्वांनाच कमी-अधिक प्रमाणात अर्थलाभ होणेही संभवते. पण या राशीच्या व्यय स्थानी असलेल्या मंगळ ग्रहामुळे असह्य मनस्ताप देणाऱ्या घटनांशी मुकाबला करावा लागण्याची शक्यता जाणवते. जपा. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात तर मंगळ-बुध या शत्रू ग्रहांच्या युतीमुळे अधिकच मनस्ताप व डोक्याला ताप होण्याची शक्यता दिसते. जपा. मनावर व विचारशक्तीवर संयम ठेवा, सहनशील व्हा, नम्रतेचे आचरण करा. तरच शुभ ग्रहांच्या काही प्रमाणातील अनुकुलतेने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळून विपरीत काळ व्यतीत करणे शक्य होईल. या राशीच्या युवकांना हातात असलेली नोकरी वा व्यवसाय सोडून नवीन काही करण्याची उर्मी येईल. पण त्यांनी तसे काही करण्याचा विचारही करू नये. नपेक्षा पश्चात्ताप करण्याची पाळी येईल. जपा. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या राहूमुळे विविध कारणानी कौटुंबिक सुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या शनि ग्रहामुळे शारीरिक, मानसिक आरोग्य बिघडवणाऱ्या घटना घडणे संभवते. काही मंडळीना एखादा मोठा आजार त्रस्त करण्याची शक्यताही दिसते. जपा. या राशीच्या पंचम

स्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल. युवक युवतींचे प्रेमसंबंध दृढ होतील. प्रसूति काळ असलेल्या स्त्रियांना पुत्र संतती होणेही संभवते. श्रद्धा असेल तर कुलदैवताची उपासना सात्विक सुखशांती देईल.

**(३) मिथुन -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा उत्तरार्धच काही प्रमाणात अनुकुल व सुखकारक होईल. पण महिन्याचा पूर्वार्ध मात्र घरीदारी मनस्ताप देणाऱ्या घटना सहन करीत घालवावा लागण्याची शक्यता जाणवते. राहूमुळे विविध कारणानी भावंड सुखात बाधा येणे शक्य दिसते. तसेच काही कोर्ट प्रकरणे असतील तर त्यांचा असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यताही जाणवते. नोकरीत भय, निराशा, मानहानी , मानसिक ताण सहन करावा लागेलसे दिसते. जपा. वडीलधा ऱ्या मंडळींच्या विरोधालाही तोंड द्यावे लागेलसे दिसते. नियोजित कार्यात अडचणी, अडथळे किंवा उशीर निर्माण होणे संभवते. अशा परिस्थितीत काही मंडळींकडून ढोंगी आचरण होण्याची शक्यता आहे. पण त्यांनी सहनशील बनून सरळपणे आचरण करणेच सुखाचे होईल. भाग्यस्थानी असलेला केतू संततिसुखात बाधा आणू शकेल. जपा. शनीमुळे काहींना कुसंगतीची बाधा होणे संभवते. तसेच शारीरिक-मानसिक आरोग्य बिघडण्याची शक्यताही जाणवते. पण अशा परिस्थितीत मनापासून अध्यात्माची आवड असेल तर उपासनेद्वारे विपरीत काळ सहन करणे सहज शक्य होईल. महिन्याच्या उत्तरार्धात परिस्थितीत सुधारणा होईल. या राशीच्या नोकरदार मंडळींना काळ अनुकुल, इच्छाआकांक्षा पूर्ण करणारा, यशदायक व लाभदायक होईल. काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळेल; तर काहींना सूचक स्वप्ने पडतील. चिकित्सक बौद्धिक व शास्त्रीय संशोधनात्मक कार्यक्षेत्र असणारांना महिन्याचा उत्तरार्ध प्रगतिकारक, यशदायक व लाभदायक होईल. धनलाभ होईल व कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. सुखस्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे स्थावर खरेदी विक्रीचे व्यवहार सुरळीत पार पडतील. पण नातेवाईक मंडळींकडून मनस्ताप दिला जाणे संभवते. जपा. काही मंडळींना मौल्यवान वस्तूंचा लाभ होणेही संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मन:शांती देईल. “बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे” नियमितपणे पठण करा.

**(४) कर्क -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा काळ सर्वसाधारण बरा असल्याचाच अनुभव येईल. पण या राशीच्या सर्व नोकरदार मंडळींना नोकरीच्या दृष्टीने मात्र संपूर्ण महिन्याचा काळ प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. बंधुवर्गाकडून मनस्ताप होणे संभवते. राहूमुळे विविध कारणांनी कौटुंबिक सुखात बाधा येणे संभवते. त्यामुळे भावनेच्या भरात भरकटत जाणे होईल. त्यातून एखाद्या अपघाताची शक्यताही नाकारता येत नाही. जलभय, विषभय आहे. जपा. तसे घडू नये म्हणून सतत मनावर आणि विचारशक्तीवर ताबा ठेवून व सहनशील बनून प्रतिकुल काळ व्यतीत करणेच सुखाचे होईल. काही मंडळींना सांसारिक जबाबदाऱ्या पूर्ण व्हाव्यात म्हणून अपार कष्ट करावे लागतील. त्यामुळे शारीरिक-मानसिक अनारोग्य होणे संभवते. काही मंडळींना रक्तविकाराचा, तर काहींना त्वचारोगाचा वा वातविकाराचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. जपा. तसेच काही मंडळींना मुखदंत विकार त्रस्त करतीलसे दिसते. अशा प्रतिकुल परिस्थितीत शुभ ग्रहांच्या काही प्रमाणातील अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. लोखंड, पोलाद अशा धातूसंबंधी व्यापार-व्यवसाय असणारांना , औषधविक्रेत्यांना , वैद्यकीय व यांत्रिकतांत्रिक व्यवसाय असणारांना काळ काही प्रमाणात अनुकुल,

प्रगतिकारक व लाभदायक होईल. पण ज्यांचा बौद्धिक व शास्त्रीय संशोधनात्मक नोकरी-व्यवसाय आहे त्यांना व साहित्यिकांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल, प्रगतिकारक , यशदायक व लाभदायक होईल. काही मंडळीना छोट्या प्रवासाचे तर काहींना परदेशगमनाचे योग येतील. श्रद्धा असेल तर शिवोपासना आणि श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मन:शांती देईल.

**(५) सिंह -** या राशीच्या मंडळींनी या महिन्याच्या काळात आपल्या अहंकारी व अधिकारशाही स्वभावावर नियंत्रण ठेवून, तोंडाला कुलूप लावून मनावर संयम ठेवून व सहनशील बनून आचरण करावे, असे आग्रहाने सांगावेसे वाटते. कारण या काळात घरीदारी, कारण असो, नसो, सतत मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता जाणवते. काहींना मुलांपैकी कोणाची आचरणविषयक समस्या त्रस्त करील, तर काहींना त्यांच्या अनारोग्याची समस्या त्रस्त करील. गैरसमज, वाद, भांडणे अशापैकी कारणांनी दाम्पत्य जीवनातील सुखातही बाधा येत असल्याचा अनुभव येईल. जपा. काही मंडळींना पोटविकाराचा आजार त्रस्त करील. सतत सावधानतेने आचरण करा. वाहन लक्षपूर्वक व सावधानतेने चालवा. अपघात भय संभवते. जपा. या राशीच्या नोकरदार मंडळींना महिन्याचा पूर्वार्धच काही प्रमाणात अनुकुल असल्याचा अनुभव येईल. महिन्याच्या उत्तरार्धात प्रतिकुल परिस्थितीला सामोरे जावे लागेल. शक्यतो प्रवास करू नका. प्रवासात त्रास, मनस्ताप, अपमान होणे संभवते. जपा. यांत्रिक-तांत्रिक व कलात्मक नोकरी-व्यवसाय असणारांना काळ प्रगतिकारक व लाभदायक होईल. या राशीच्या धनस्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे व्यवसायात लाभ होतील, कर्ज असल्यास त्याचे हप्ते भरणे शक्य होईल. तसेच ते कुटुंब स्थान असल्याने कुटुंबात शुभ घटना घडतील. या राशीचे विद्यार्थी उत्तम आरोग्य राखू शकले तरच त्यांना शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल. गुरु ग्रहाप्रमाणेच बुध -शुक्र हे ग्रहही काही प्रमाणात अनुकुल असल्याने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. श्रद्धा असेल तर श्रीगायत्री देवीची उपासना करा. दररोज नियमितपणे गायत्री मंत्राचा जप करा.

**(६) कन्या -** या राशीच्या मंडळीना नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने या महिन्याचा पूर्वार्धच अधिक अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. चिकित्सक बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना बौद्धिक राशीतील गुरु ग्रहाच्या अनुकुलतेमुळे प्रगती करणे व यश मिळवणे सहज शक्य होईल. पण त्यासाठी शारीरिक-मानसिक आरोग्य उत्तम राखता आले पाहिजे. कारण या संपूर्ण महिन्याच्या काळात शनि-राहू-मंगळ व महिन्याच्या उत्तरार्धात रवि हे प्रमुख ग्रह प्रतिकुल असणार आहेत. त्यामुळे घरीदारी सतत मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता दिसते. काळ प्रतिकुल असल्यामुळे सतत मनावर व विचारशक्तीवर ताबा ठेवून व सहनशील बनून नम्रतेचे आचरण केलेत तरच आरोग्य उत्तम राहू शकेल. नपेक्षा शारीरिक उष्णता भडकून उष्णता विकार बळावतील. विशेष करून काही मंडळीना मूळव्याधीसारखा आजार त्रस्त करील. जपा. सर्व प्रकारच्या छोट्या-मोठ्या अपघातापासून रक्षण व्हावे म्हणून सतत सावधानतेने वागा. शारीरिक-मानसिक कष्ट झाले तर खूप थकवा येणे संभवते. जपा. या राशीच्या व्ययस्थानी असलेला राहू शत्रूपासून रक्षण करील, काहींना परदेशगमनाची संधी देईल, अर्थ प्राप्तीस मदत करील; पण दाम्पत्य जीवनातील सुखात बाधा निर्माण करील. जपा. सप्तम स्थानी असलेला हर्षल ग्रहही वैवाहिक जीवनात बाधा निर्माण करील. भागीदारीत व्यापार-व्यवसाय असेल तर

त्यात संशय, गैरसमज  अशापैकी  कारणानी बाधा येणार नाही, याची काळजी घ्या. शक्यतो वाद, भांडणे टाळा. काहींचे मातेशी पटणार नाही; तर काहींना मातेसंबंधीची समस्या त्रस्त करण्याची शक्यता आहे. संततीसुख  लाभेल व या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल. श्रद्धेने श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना करा. दररोज नियमितपणे " बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे" पठण करा.

**(७) तूळा -** या राशीच्या मंडळींची मनस्थिती सध्या अतिशय भावनाशील व चंचल अशी झाली असण्याची शक्यता दिसते. पण अध्यात्मात रस असेल तर आध्यात्मिक उपासनेद्वारे मन स्थिर व शांत होईल. सामाजिक कार्यात रस असेल तर त्यासाठी काळ अनुकुल होईल. मात्र अशा सामाजिक कार्यासाठी शक्यतो प्रवास करू नका. प्रवासात त्रास होणे संभवते. या राशीच्या सर्व नोकरदार मंडळींना महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल व लाभदायक होईल. शासकीय, निम-शासकीय नोकरीत असणारांना सहज वाममार्ग धन मिळणे  शक्य असले तरी त्यांनी तो  मोह कटाक्षाने टाळावाच. कला क्षेत्र, साहित्यक्षेत्र असे कार्यक्षेत्र असणारानाही काळ अनुकुल, प्रगतिकारक, यशदायक व लाभदायक होईल. पण कार्यक्षेत्र कोणतेही असो, अति विचार करू नका. नपेक्षा डोकेदुखीचा असह्य  त्रास सहन करावा लागण्याची  शक्यता दिसते.  काही मंडळीना मेंदुविकाराचा त्रास होणेही संभवते. शिवाय काही मंडळीना मुदतीच्या तापाचा आजार होणेही संभवते. जपा. शनि ग्रहाच्या अनुकुलतेने या राशीच्या युवकांना नवी नोकरी किंवा नवे  कार्यक्षेत्र मिळणे शक्य आहे. पण हाच शनि ग्रह भावंड सुखात बाधा निर्माण करू शकेल. जपा. कौटुंबिक जीवनात सुखसमाधान  मिळावे यासाठी वाद, गैरसमज होणार नाहीत याची काळजी घ्या. तसेच वैवाहिक जीवनात जीवनसाथीचे अनारोग्य, दोघांतील वाद, गैरसमज  अशापैकी कारणांनी अपेक्षित वैवाहिक जीवनातील सुखातही बाधा येणे शक्य आहे. जपा. भागीदारीत व्यापार व्यवसाय असणारांनी संशयाने भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. कोर्ट प्रकरण असेल तर ते पुढे ढकलण्याचा प्रयत्न करा. श्रद्धा असेल तर शिवोपासना किंवा कुलदैवताची उपासना मन:शांती देईल.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या  मंडळीना या महिन्याची एकूण ग्रहस्थिती कौटुंबिक सुख, गृहसौख्य व

आरोग्य या दृष्टीने प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. सतत परिस्थितीला दोष देणारी मनोवृत्ती, कोणाशीही पटवून न घेण्याचा स्वभाव, घडणाऱ्या अनिष्ट घटना, आर्थिक चिंता , चोरी, फसवणूक होणे, अपप्रचारामुळे मनस्ताप होणे, मनात योजल्याप्रमाणे काहीही न घडणे अशापैकी कारणांनी असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. त्यामुळे शारीरिक - मानसिक आरोग्य बिघडण्याची  शक्यताही दिसते. ताप येणे, उष्णतेने अंगावर फोड येणे, जखम होणे, हाडमोड होणे अशापैकी आजार त्रस्त करण्याची शक्यता दिसते. जपा. रक्तविकार, हृदयविकार असणारांनी मनाचा क्षोभ होणार नाही याची काळजी घ्यावी. भावविचारांवर ताबा ठेवून, सहनशील बनून व जिभेला लगाम घालून आचरण करणेच सुखाचे होईल.  बौद्धिक नोकरी-व्यवसाय, वैद्यकीय  संशोधन  क्षेत्र , यांत्रिक तांत्रिक  नोकरी-व्यवसाय असणारांना तसेच औषध विक्रेत्यांना  काळ काही प्रमाणात अनुकुल होईल. पण शासकीय, निम-शासकीय नोकरदार

मंडळींना मात्र वरिष्ठांचा त्रास सहन करावा लागण्याची दाट शक्यता दिसते. जपा. नातेसंबंधात दुरावा निर्माण झाल्यास मन अस्वस्थ
होईल. विविध कारणांनी अपेक्षित संततिसुख मिळेलच याची खात्री देता येत नाही. मात्र या राशीचे विद्यार्थी आरोग्यसंपन्न राहू शकले तर त्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल होईल. गुरु ग्रहाच्या अनुकुलतेने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना अनुकुल होईल.

**(९) धनु -** या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या काळात स्वत:च्या तसेच जीवनसाथीच्या अनारोग्य विषयक समस्यांना सामोरे जावे लागेलसे दिसते. तसेच नियोजित कार्यात सतत अडचणी,
अडथळे येत गेल्यास गहरे नैराश्य येणेही संभवते. जपा. प्रिय जनांच्या स्थलांतरामुळे वा दूरत्वामुळे
या राशीच्या काही मंडळींना अस्वस्थ वाटेल. काहींना इच्छा नसताना दूरच्या प्रवासास जावे लागण्याची शक्यताही दिसते. सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. विशेष करून बौद्धिक, शैक्षणिक कार्यक्षेत्र असणारांना ह्या महिन्याचा पूर्वार्ध अधिक लाभदायक व सुखकारक होईल. या राशीच्या व्यापारी मंडळींना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. तसेच भावनाशील मन व अध्यात्माची आवड असणारांना संपूर्ण महिन्याचा काळ कमी-अधिक प्रमाणात अनुकुल, सुखकर, व शांतिदायक होईल. काही मंडळींना जलप्रवासाचे तर काहींना परदेशगमनाचे योग येणेही संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात अस्वस्थ मनस्थितीमुळे घरीदारी सर्व ठिकाणी कोणाशीही पटणार नाही, आहे त्यात सुखसमाधान लाभणार नाही, वास्तुसुख मिळणार नाही. जपा. विविध कारणांनी संततिसुखातही बाधा येणे संभवते. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी विशेष जपावे. फार दगदग करू नये. वैद्यकीय व यांत्रिक-तांत्रिक शिक्षण घेत असणाऱ्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल होईल; पण इतर प्रकारचे शिक्षण घेत असलेल्यांना मात्र विविध कारणांनी शैक्षणिक प्रगतीत अडथळे, अडचणी येत असल्याचा अनुभव येईल. कौटुंबिक सुख व गृहसौख्य लाभावे यासाठी भगवान शंकराची व श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना करा. महिम्न स्तोत्र व बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे दररोज नियमितपणे पठण करा.

**(१०) मकर -** या राशीच्या मंडळींचा शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ नुकताच सुरू झाला आहे. त्यामुळे त्यांनी सतत सावधानतेने व मनावर संयम ठेवून आणि सहनशील बनून आचरण करावे, असे आग्रहाने सांगावेसे वाटते. कारण कौटुंबिक वाद, आप्तेष्ट भांडणे, मानहानी व मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची दाट शक्यता दिसते. जपा. तसेच आर्थिक समस्या , फसवणूक, वाढत्या खर्चाची चिंता त्रस्त करील. जपा. काही मंडळीना कोर्ट प्रकरणाचा त्रास सहन करावा लागेलसे दिसते. सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळीना महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल, सुखकारक व लाभदायक होईल. वरिष्ठ अधिकारी तुमच्या कामाचे कौतुक करतील, काहीना बढती, पगारवाढ, उच्च पद, मानाचे स्थान अशापैकी काहीतरी मिळेलच असे वाटते. पण आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करून सहज वाममार्ग धन मिळवण्याचा मोह मात्र करू नका. होत्याचे नव्हते होण्यास वेळ लागणार नाही. जपा. जन्मकुंडलीत योग असतील तर काहींना वास्तुलाभ होणेही संभवते. उच्च व

चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्र, शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना काळ प्रगतिकारक, यशदायक व लाभदायक होईल. काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळणेही संभवते. अध्यात्मात रस असलेल्यांना आध्यात्मिक उपासनेद्वारे अध्यात्मात प्रगती करणे व कीर्ती मिळवणे सहज शक्य होईल. काही मंडळींना राहत्या जागेची समस्या त्रस्त करील; तर काहींच्या घरात असमाधानकारक घटना घडतील; तसेच काहींना भांडणे, वाद अशापैकी कारणांनी कौटुंबिक सुख व गृहसौख्य मिळणे अशक्य होईल. जपा. संततिसुख लाभेल. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करणे सहज शक्य होईल. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मन शांत राहील. दररोज नियमितपणे हनुमान चालीसा स्तोत्राचे पठण करा.

**(११) कुंभ -** या राशीच्या मंडळींची मनस्थिती सध्या अत्यंत कोमल झाली असण्याची शक्यता जाणवते. तसेच मानसिक संवेदनाही अत्यंत शीघ्र होत असाव्यात . त्यामुळे मनाला त्रास होईल असे थोडे काहीही घडले तरी लगेच मन उदास होऊन गहरे नैराश्य येत असावे, असे वाटते. अशा परिस्थितीत आपल्या जिभेला लगाम घाला. कारण आपल्या फटकळ बोलण्याने इतरांची मने अकारण दुखावली जातील. जपा. तसे घडत असेल तर मन:शांतीसाठी शिवोपासना करा. पुरुषांनी " ओम नम: शिवाय " व स्त्रियांनी "ओम शिवाय नम: " या मंत्राचा सतत जप करावा, असे आग्रहाने सांगावेसे वाटते. रक्तदाब व हृदयविकार असणारांनी तर अशी साधना करून मन व विचारशक्ती शांत व स्थिर राखण्याचा प्रयत्न करावा. तरच शारीरिक-मानसिक अनारोग्याचा त्रास सहन करणे शक्य होईल. सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना संपूर्ण महिन्याचा काळ प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. त्यामुळे संयम व सहनशीलतेने आचरण करणेच सुखाचे होईल. शनि-मंगळ शुभ योगामुळे यांत्रिक-तांत्रिक नोकरी-व्यवसाय असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. पण शनि ग्रहामुळे संततिसुखात व राहूमुळे वैवाहिक जीवनातील सुखात विविध कारणांनी बाधा येणे संभवते. जपा. या राशीचे विद्यार्थी सर्व प्रकारचे आरोग्य उत्तम राखू शकले तरच त्यांना शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल. या राशीच्या ज्या मंडळींच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभाचे योग असतील अशापैकी काहींना असा अचानक धनलाभ वा वारसा हक्काने धनलाभ होणे संभवते. तसा लाभ झाल्याचे कळविल्यास बरे वाटेल. श्रद्धेने "शिवोपासना " कराच; पण त्याबरोबर " हनुमानचालिसा" स्तोत्राचे पठणही करा.

**(१२) मीन -** या राशीच्या मंडळींची मनस्थिती सध्या अस्थिर, चंचल अशी झाली असून स्वभावही लहरी झाला असावा असे वाटते. उपदेश, धाक, दडपण असे काहीही सहन होत नसावे. या राशीची लहान मुले तर अत्यंत हूड व व्रात्य झाली असणे संभवते. तसे असेल तर त्यांना जपा. रवि-बुध-मंगळ हे ग्रह प्रतिकुल असल्यामुळे मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता जाणवते. त्यामुळे मन अस्वस्थ राहील व नैराश्य येणेही संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात श्रम, दगदग होऊन थकल्यासारखे वाटेल. शारीरिक उष्णता भडकून उष्णता विकार बळावतील. जपा. काहींना नेत्रविकाराचा तर काहींना घसा, दाढा, मान दुखण्याचे आजार त्रस्त करतीलसे दिसते. अनपेक्षितपणे
निर्माण होणाऱ्या आर्थिक जबाबदाऱ्या चिंताग्रस्त करतील. देणे द्यावेच लागेल; पण येणे वसूल होण्याची शाश्वती नसल्याने काही जण अस्वस्थ होतील. नोकरी कोणतीही असो, कामाचा ताण,

मनस्ताप देणाऱ्या घटना यांचा असहय त्रास सहन करावा लागेलसे दिसते. अशा परिस्थितीत मनावर संयम ठेवून व सहनशील बनून आचरण करणेच सुखाचे होईल. गुप्त पोलीसखात्यात काम करत असणारांना मात्र काळ अनुकुल व यशदायक होईल. ज्यांचा परधर्मीयांशी व्यावसायिक संबंध आहे, अशांना अशा संबंधामुळे विविध प्रकारचे लाभ होतील. गुरु ग्रहामुळे विवाहेच्छूचे विवाह ठरतील. प्रेमसंबंध असतील तर ते दृढ होतील. काही मंडळींचे नवे स्नेहसंबंध निर्माण होतील. शुभ ग्रहांच्या काही प्रमाणातील अनुकुलतेने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. श्रद्‌धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल. दररोज नियमितपणे " बावन्न श्लोकी गुरुचरित्रा" चे पठण करा.

======00000O00000=======